**स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर**

Chaudhari Patil English Medium School
Inword No. 0023
Inword Dt. 23/05/14

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा/४१/१४
पुणे १ दिनांक :-०९/०१/२०१४
दि. २३/०५/२०१४.

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बुद्रुक,
पो.रेटवडी, ता.खेड, जि.पुणे.

**विषय:-** सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण (क्र. १ ,६ व २४) २०१२.
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचा शासन निर्णय क्र. स्वयंअ. २०१३/ (८५/१३)/ माशि-१, दिनांक १५ जून २०१३.
३) मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. शिउसं/प्राथ-२/ स्वयंअशाळा/मान्यता / पुवि/ १३/ २३१८१/८४, दि.१३ सप्टेंबर २०१३
४) मा.शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र.अमाशा/स्वयंअर्थ/ २०१३/ १५-क (५) १०८४२ दि.२० नोव्हेंबर २०१३

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर **नवीन शाळा स्थापना** करणे, तसेच **विद्यमान शाळेचा दर्जावाढ** करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार **नविन शाळा स्थापन करणेकरिता /विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | मुळ यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | वर्ग | शाळा सुरु केल्याचा दिनांक | नविन शाळा/ दर्जा वाढ | शाळेचा प्रकार (प्राथमिक/उच्च प्राथमिक) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ६८७ | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बुद्रुक, पो.रेटवडी, ता.खेड, जि.पुणे | चौधरी पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, खरपुडी बुद्रुक, पो.रेटवडी, ता.खेड, जि.पुणे | इंग्रजी | इ.१ ली ते इ.५ वी | जून २००९ पासून | नविन | प्राथमिक |

**अटी व शर्ती**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
४. संदर्भ क्रमांक ०४ अन्वये सन २०१३-१४ मध्ये सुरु असलेल्या वर्गासह परवानगी देण्यात येत आहे.
५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

कनिष्ठ लिपीक
शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१. मा. सु. न. जोशी अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
३. मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.
४. मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-०१.
५. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, खेड, ता.खेड, जि.पुणे

लिपीक,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
म. रा. पुणे-१

**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

**शासन निर्णय क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि १**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२.

**दिनांक :- १५ जून, २०१३**

**वाचा :-**

१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक १ दिनांक ०४ जानेवारी, २०१३

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ६ दिनांक १९ जानेवारी, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक प्राशातु - १११२ / (२५८/२०१२) / प्राशि - ३, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३

४) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५ दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३

५) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक ५७, ५८ व ५९ दिनांक २० एप्रिल, २०१३

६) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र २००९ / (६६३/०९) / माशिं - १, दिनांक २० जून, २०१२

**प्रस्तावना -**

राज्यातील सर्व शाळांना **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** लागू करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यामध्ये सर्व नवीन

खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देताना **हेतुपत्र** (Letter of Intent) **व शाळा मान्यता प्रमाणपत्र** (Letter Of Approval) ची पध्दती स्वीकारावी असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने CBSE, ICSE इत्यादी बोर्डाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता शासन निर्णय दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

२. कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना मान्यता देणे व विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे यासाठी शासनाने सन २०१३ मध्ये **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** पारित केला असून त्याची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात आलेली आहे. या अधिनियमाच्या अनुषंगाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त ७,१०८ अर्जाची छाननी करुन दिनांक १५ मे, २०१३ रोजी २,४१७ अर्जांना पात्र करण्यात आलेले आहे. या पात्र प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या पध्दतीने करावी ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

## शासन निर्णय -

(१) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,** २०१२ अन्वये सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ७१०८ प्रस्तावांपैकी पुढीलप्रमाणे २४१७ प्रस्ताव पात्र म्हणून जाहीर करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण प्राप्त प्रस्ताव | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | ६,१२१ | १,९७७ | ४,१४४ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ९८७ | ४४० | ५४७ |
| | एकूण | ७,१०८ | २,४१७ | ४,६९१ |

(२) **शाळा दर्जावाढीच्या ४४० पात्र शाळांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून वर्ग सुरु करण्याबाबतची परवानगी देण्यात येत आहे.**

(३) **नवीन शाळांचे प्रस्ताव** - वरीलप्रमाणे पात्र ठरलेल्या १२७७ नवीन शाळांना याद्वारे परवानगी देण्यात येत आहे. प्रत्येक शाळेने **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे उपरोक्त संबंधित पात्र ठरलेल्या शाळांच्या व्यवस्थापनांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन शाळा प्रथम मान्यतेसाठी संबंधित सक्षम अधिकाऱ्यांकडे एक महिन्याच्या कालावधीत अर्ज करावेत. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(४) पूर्व प्राथमिक शाळांना स्वतंत्र शाळा म्हणून मंजूरी देण्यात आलेली नसून त्या प्राथमिक शाळेला संलग्न म्हणून मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यानुसार या अंतर्गत सुरु होणा-या शाळांना इयत्ता १ली पासून परवानगी देण्यात येईल.

(५) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल. या अधिनियमामधील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास किंवा तिचा दर्जावाढ करण्याकरीता दिलेली परवानगी ही ज्या शैक्षणिक वर्षाकरीता देण्यात आलेली असेल त्या शैक्षणिक वर्षाकरीता असेल आणि अशी परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

(६) सोबतच्या विवरणपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील त्याचप्रमाणे **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** यातील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(७) सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या जिल्हानिहाय तपशीलानुसार नवीन शाळा स्थापन करण्यास किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य सचिवांकडून संबंधित अर्जदाराला वैयक्तिरित्या कळविणे आवश्यक राहील व त्याची पोच शासन दप्तरी ठेवण्यात यावी.

(८) सोबतच्या विवरपत्रात परवानगी देण्यात आलेल्या नवीन / दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय DISE Data मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद / क्रमांक घेणे आवश्यक राहील. याबातची पुढील कार्यवाही राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे सर्व संबंधितांच्या माहितीकरीता शाळेबाहेर स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन / दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहीर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. 201306151740421‍9 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रकाश ठुबे)
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,
शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
विभागातंर्गत सर्व संचालक.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषदा.
सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
मा. मंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री, (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा.अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.
निवडनस्ती माशि - १.

| अनु. क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | प्रस्तावित शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | नवीन शाळा / दर्जा वाढ | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय | शाळेचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| ६८३ | पुणे | समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, मु.पो.बेल्हे, ता.जुन्नर | समर्थ गुरुकुल, बांगरवाडी, पो.बेल्हे, ता.जुन्नर | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६८४ | पुणे | हुतात्मा राजगुरु शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरुनगर, ता. खेड | [illegible] इंग्लिश मिडीयम स्कूल, राजगुरुनगर, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६८५ | पुणे | शिवशंकर शिक्षण संस्था, राजगुरुनगर, ता.खेड | डी.जे. केंब्रिज स्कूल, पानमळा, तुकईवाडी, राजगुरुनगर, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६८६ | पुणे | श्री भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, मु.पो.रासे, ता.खेड | पिनॅकल इंग्लिश मिडीयम स्कूल, मु.पो. रासे, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६८७ | पुणे | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बुद्रुक, पो.रेटवडी, ता.खेड, जि.पुणे | चौधरी पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, खरपुडी बुद्रुक, पो.रेटवडी, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६८८ | पुणे | जैद पाटील एज्युकेशन सोसायटी, चिंबळी, ता.खेड | शांताई मेमोरियल स्कूल, चिंबळी, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६८९ | पुणे | ग्लोबल फाऊंडेशन शेलपिंपळगांव, ता.खेड | डी.डी. मोहिते पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, शेलपिंपळगांव, ता.राजगुरुनगर | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९० | पुणे | रयत शिक्षण संस्था, सातारा | न्यू इंग्लिश स्कूल, वाडा, मु.पो.वाडा, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९१ | पुणे | एस.ए. एज्युकेशनल ट्रस्ट, तुंगा गाव साकी विहार रोड, मुंबई | शिवाजीराव वाळुंज इंग्लिश मिडीयम स्कूल, देवोशी, ता.खेड | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९२ | पुणे | कँथड्रल विद्या ट्रस्ट, शिलाटणे, ता.मावळ | कँथड्रल विद्या स्कूल, शिलाटणे, पो.कार्ला,ता.मावळ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९३ | पुणे | रयत शिक्षण संस्था , सातारा | न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल, वडगांव मावळ, ता.मावळ | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९४ | पुणे | लोकमित्र शिक्षण संस्था, मारुंजी, ता.मुळशी (पौड) | सनफ्लॉवर किडस स्कूल, मारुंजी, ता.मुळशी (पौड) | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९५ | पुणे | ताराबाई नलावडे शिक्षण प्रसारक मंडळ, निगडे मोसे, ता.वेल्हा | युनिफ इंग्लिश मिडीयम स्कूल, निगडे मोसे, ता.वेल्हा | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९६ | पुणे | व्यंकटेश कृपा शुगर मिल्स लि. ता. शिरुर जि.पुणे | व्यंकटेश कृपा इंग्लिश मेडियमस स्कुल, जातेगाव ता. शिरुर जि.पुणे (राज्य मंडळ) | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |
| ६९७ | पुणे | गिता शिक्षण प्रसारक मंडळ पळसदेव ता. इंदापुर जि.पुणे. | एल.जी.बनसोडे इंग्लिश मेडियम स्कुल माळेवाडी पळसदेय ता. इंदापुर जि.पुणे. | इंग्रजी | नवीन शाळा | पात्र | प्राथमिक |

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/ 934/ 2024    पुणे । दिनांक: /10/2024 23/12/2024

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बु. ता. खेड, जि. पुणे संचालित
चौधरी पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, ( 27250817806 ) खरपुडी, बु. ता. खेड, जि.पुणे

विषय - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-1114/प्र.क्र.40/ एसएम-2, दिनांक 26/02/2014 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/प्राथ-2/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/2014 दिनांक 17/05/2014
3.मुख्याध्यापक यांचेकडील प्रस्ताव दिनांक 25/09/2024
4.श्री. शब्बीर लालू शेख, विस्तार अधिकारी(शिक्षण), जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 14/10/2024

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पूर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बु. ता. खेड, जि. पुणे | चौधरी पाटील इंग्लिश मिडीयम स्कूल, ( 27250817806 ) खरपुडी, बु. ता. खेड, जि.पुणे | इंग्रजी | दर्जावाढ स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 6 वी ते इयत्ता 8 वी | 2014-15 |

अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1114/प्र.क्र.40/ एसएम-2, दिनांक 26/02/2014 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. भविष्यात या शाळेच्या प्रथम मान्यते बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उदभवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.**

२) **शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.**

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| एकूण | | २२१७ | १४८३ | ३७०० |

**१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** - या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे.

**१.२.अपात्र शाळा-** नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी** देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमांनुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना
i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,
ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०13 चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम,** शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,

"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **"स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

**(रा.ग.गुंजाळ)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.

१२. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका

प्रत माहितीसाठी **अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

५. निवडनस्ती (एसएम २).

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1047 | पुणे | चाकण शिक्षण मंडळ, चाकण, ता.खेड, जि.पुणे | नवोन्मेष इंग्लिश मिडीयम स्कूल, चाकण, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1048 | पुणे | सुर्यदत्ता एज्युकेशन फाऊंडेशन, सदाशिव पेठ, पुणे | सूर्यदत्ता नॅशनल स्कूल, बावधन बु. पाटीलनगर, पुणे-21 | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1049 | पुणे | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठान, खरपुडी बु., ता. खेड, जि.पुणे | चौधरी पाटील इंग्लिश् मिडीयम स्कूल, खरपुडी बु., ता.खेड, जि.पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1050 | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, मोई, कुरुळी, ता. खेड, जि.पुणे | श्री समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, चिंबळी फाटा, चिंबळी, ता.खेड,जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1051 | पुणे | ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती, जि.पुणे | शारदाबाई पवार विद्यामंदीर, शारदानगर, मु.पो.माळेगांव कॉलनी, मु.पो.माळेगांव बु., ता.बारामती, जि.पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | मराठी | पात्र |
| 1052 | पुणे | उमाबेल एज्युकशनल फाऊंडेशन, औंध, पुणे | बॉब-प्रायमन इंटरनॅशनल स्कूल, गट नं.97/7, घर नं.765/1, चांदखेड, ता.मावळ, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1053 | पुणे | विद्याधन एज्युकेशन सोसायटी, नेताजी नगर, पिंपळे गुरव, पुणे | जिज्ञासा नॅशनल स्कूल, 797, मु.पो. केंजळ, ता.भोर, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1054 | पुणे | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नामदार श्री शरदचंद्र पवार प्राथमिक विद्यालय, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1055 | पुणे | श्री पांडूरंग ग्रमीण विकास प्रतिष्ठाण, निमगांवसावा, जुन्नर, पुणे | नंदीग्राम इंटरनॅशनल स्कूल, निमगांवसावा, ता.जुन्नर, जि.पुणे | नवीन शाळा | उच्च प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 1056 | अहमदनगर | स्वामी विवेकानंद ग्रामविकास प्रतिष्ठाण वसू जळगाव ता.पाथर्डी जि.अहमदनगर | स्वामी विवेकानंद विद्यालय वसू जळगाव ता.पाथर्डी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 1057 | अहमदनगर | आप्पासाहेब धनवटे मेमोरियल ट्रस्ट पुणतांबा ता.राहाता जि.अहमदनगर | लिटल एन्जल्स सेकंडरी स्कूल पुणतांबा ता.राहाता | नवीन शाळा | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |

परवानगी वर्ष :-२०१६-२०१७
माध्यम : इंग्रजी
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१७/१४३५६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : - - 1 JUL 2017

**प्रति,**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय : सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ साठी जून-२०१६ पासून प्रथम मान्यता देण्याबाबत.**
**संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे संचलित चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल, खरपुडी, ता.खेड, जि. पुणे**

संदर्भ :- १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९ एसएम-२ दिनांक १७.६.२०१६
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /माध्य-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१६ १६२८१-८४, दिनांक १९.७.२०१६
३) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/नवीन शाळा/२५१३, दिनांक २४.५.२०१७

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे संचलित चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल, खरपुडी, ता.खेड, जि. पुणे** या माध्यमिक शाळेच्या **इयत्ता ९ वी च्या वर्गासाठी** जुन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी जून २०१६ पासून आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता इंग्रजी माध्यमिक दर्जावाढ साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे

४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१६-१७** पासून असेल

१३.शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य - अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी नवीन माध्यमिक शाळा / वर्ग** असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील

१६.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७.महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

१.प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पुर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(दिनकर टेमकर )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. मुख्याध्यापक, संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे संचलित चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल, खरपुडी, ता.खेड, जि. पुणे**

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, **संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे**

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२

२.निवडनस्ती.

परवानगी वर्ष :-२०१६-२०१७
माध्यम : इंग्रजी
**स्वंयअर्थ सहाय्यित शाळा**
(माध्यमिक)

जा.क.शिउसं/माध्‍ ३२/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१७/४६२०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 15 JUL 2017

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय :** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन)अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ साठी जुन-२०१६ पासून प्रथम मान्यता देण्याबाबत.
संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे संचलित चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल, खरपुडी, ता.खेड, जि. पुणे

**संदर्भ :-** १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१६/प्र.क्र.६१ एसएम-२ दिनांक १७.६.२०१६
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं /माध्य-३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/१६ १६२८१-८४, दिनांक १९.७.२०१६
३) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/नवीन शाळा/२२८८३, दिनांक १०.०७.२०१७

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये **संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे संचलित चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल, खरपुडी, ता.खेड, जि. पुणे** या माध्यमिक शाळेच्या इयत्ता **१० वी च्या वर्गासाठी** जुन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी जून २०१६ पासून आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता इंग्रजी माध्यमिक दर्जावाढ साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.
३.माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे
४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.
५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.
७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.
८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.
१०.संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष **२०१६-१७** पासून असेल
१३.शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत
१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा यांना शासनाच्या वेळावेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अथसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील
१६.महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेच भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
१७.महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **U-Dise** मध्ये माहिती भरताना स्वंय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

**इतर अटी :**

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक)यांची राहील.

१.प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल.परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(दिनकर टेमकर )
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग पुणे-१.**

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**

**१. मुख्याध्यापक, संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे संचलित चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल, खरपुडी, ता.खेड, जि. पुणे**

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, **संत ज्ञानेश्वर विदया प्रतिष्ठान खरपुडी ता.खरपुडी जि. पुणे**

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१.मा.अवर सचिव (माशि-१) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२.

२.निवडनस्ती.

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa35ecb44970562d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

**( रा. ग. गुंजाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०. सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११. निवडनस्ती (एसएम-२).

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ११०७ | पुणे | कै.मधूकररजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळविद्या कॉर्नर हॉफिस,नं.308&31 एमआयडीसी,बारामती,ता.बारामती जि.पुणे 413102 | श्री संत सावतामाळी प्रायमरी स्कूल,इंग्लिश मेडीयम, मु.पो.डोर्लेवाडी,ता.बारामती जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| ११०८ | पुणे | कै.एन जी. बराटे एज्युकेशनल ट्रुस्ट,इंग्रजीनगर,अंकूश पायगुडे कंपनी,कोंढवे धावड,उत्तमनगर,पुणे | ब्यु बर्ड स्कूल,इंग्रजीनगर,अंकूश पायगुडे कंपनी,कोंढवे धावड,उत्तमनगर,पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| ११०९ | पुणे | श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळनीरा बारामती रोड, सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे | सोमेश्वर पब्लिक स्कूल सोमेश्वरनगरमु.पो.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे पिन - ४१२३०६ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११० | पुणे | आनंद मेडीकल फौन्डेशनम.पो.कुरुळी,ता.खेड जि.पुणे.410501 | आनंद इंग्लिश मेडीयम स्कूलमु.पो.कुरुळी ता.खेड जि.पुणे 410501 | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| ११११ | पुणे | यशवंत एज्युकेशन अॅन्ड रिसर्च अॅकॅडमी17,हिंदविजय को.ऑ.हौसिंग सोसायटी, विमाननगर,पुणे 411004 | शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,मु.पो.वाघापूर,ता.पुरंदर जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११२ | पुणे | ब्रिलियन्स एजुकेशनल फाऊनडेशन मु.पो. जुन्नर,ता.जुन्नर जि. पुणे, ४१०५०२ | हिरा इंग्लिश मेडियम स्कूलगट नंबर ३७०, मु. खानापूर, पो.जुन्नर, तालुका जुन्नर,जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११३ | पुणे | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठाण,खरपूडी ता.खेड जि.पुणे. | चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल,खरपूडी ता.खेड जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११४ | पुणे | श्री विघ्नहर ट्रुस्टिनवृत्तीनगन,पो.शिरोळी बु ता.जुन्नर जि.पुणे 410511 | स्व प्रा रामकृष्ण मोरे इंग्लिश मेडिअम स्कूलनिवृत्तीनगर पोस्ट - शिरोली बु ता.-जुन्नर जिल्हा, पुणे पिन -४१०५११ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११५ | पुणे | इंडिअन सोसायटी फॉर सोशल अक्शनटी-२०, नंदनवन, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे, पिन कोड - ४११०२७ | मेरी मेमोरिअल स्कूलपाटस-कांगाव रोड, पाटस, तालुक- दौंड, झिला-पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११६ | पुणे | श्री स्वामी समर्थ कृपा एज्युकेशन सोसायटीए/4,गिरीराज हॉसिंग कॉम्पेक्स, बालाजीनगर,चिंचवड,पुणे.4110033 | श्री स्वामी समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूल, गेट नं .468,ग्रामपंचायत मिळकत,नं.2249,शंकरनगर,मेदणकर वाडी, चाकण ता.खेड जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११७ | पुणे | हर्षवर्धन पाटील बहुउदेशिय संस्थाशेटफळगढे तालुका इंदापूर जिल्हा पुणे | श्री नागेश्वर इंग्लिश मेडीयम स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजशेटफळगढे, तालुका इंदापूर जिल्हा पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११८ | पुणे | शतनू श्रीकांत शिक्षण संस्था,पुणे,98/1,ढोरेनगर, जुनी सांगवी पुणे 27 | दि न्यु डेल इंग्लिश मेडीयम स्कूलघोटवडे,ता.मुळशी जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| १११९ | पुणे | साई विद्या प्रतिष्ठानबालाजीनगर, मेदनकरवाडी, चाकण ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ | होली एंजल्स इंग्लिश मिडीअम स्कूलवडगाव घेनंद रोड, भोसे, चाकण, ता - खेड जि - पुणे. ४१०५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| ११२० | पुणे | प्रबोधिनी विद्या प्रतिष्ठान दौंडर३ महेश सोसायटी गोपाळवाडी रोड दौंड ता.दौंड जि.पुणे. | लर्न अॅन्ड प्ले सेकंडरी स्कूलमहेश सोसायटी, गोपाळवाडी रोड, दौंड ता.दौंड जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |
| ११२१ | पुणे | स्व गुलाबराव गोरे प्रतिष्ठानमु पो चाकण ता खेड जि पुणे ४१०५०१ | भामा इंग्लिश मेडियम हाय स्कूलमु ..पो चाकण ता. खेड जि. पुणे 410501 | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी.ते १० वी.) | इंग्रजी |